## थंड हवेसाठी पंखे :

छताला आधार देणाऱ्या खांबाच्या सहाय्याने जमिनीपासून ७ ते ९ फुट उंचीवर पंखे लावावेत.



## फॉगर प्रणाली :

फॉगर्स प्रणाली पाण्याच्या थेंबाचे रूपांतर सूक्ष्म कणामध्ये करून गोठ्यातील हवा थंड ठेवण्यास मदत करते.



## स्प्रिंकलर प्रणाली :

स्प्रिंकलर वापर गायींच्या अंगावरील केसांचा थर ओला ठेवण्यास करावा. त्यामुळे पाण्याची वाफ होईल आणि त्वचा थंड होवून गायींना उष्णतेपासून आराम मिळेल.



## उन्हाळ्यात दुभत्या जनावरांना द्यावयाचा विशिष्ट चारा :

- जनावरांना ताजा, उच्च गुणवत्ता असलेला, रुचकर व सहज पचण्यायोग्य चारा द्यावा, जुना चारा किंवा खाद्य देणे टाळावे.
- खाद्यातील एकूण पोषक घटकांचे (कॉन्संट्रेट) प्रमाण वाढवावे. यामुळे खाद्याचा दर्जा वाढेल व खाद्य पोषक व पचण्यास सोपे होऊन ते जनावरांना सहज उपलब्ध होतील.
- बारीक केलेल्या कापसाच्या किंवा सोयाबीनच्या बिया किंवा यांच्या वेगवेगळ्या मिश्रणातून अधिक २-३% फॅट पुरवावे.
- अतिरिक्त पूरक जीवनसत्त्वे आणि खनिजे द्यावीत. एकूण कोरड्या चाऱ्याच्या ह्या प्रमाणात, सोडियम (०.४५%), मॅग्नीशियम (०.३५%), अ जीवनसत्व (१००००० आययू), ड जीवनसत्व (५०००० आययू) आणि इ जीवनसत्व (५०० आययू) चाऱ्यातून द्यावे.

Technical folder no. : 7

संग्रहण

बि. सज्जनार, एस. एस. पवार, एम. पी. ब्राह्मणे, ए. व्ही. निर्मळे, एन. पी. कुराडे, एस. के. बल आणि एन. पी. सिंह

अधिक माहितीसाठी संपर्क

निदेशक

भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान


माळेगाव, बारामती 413 115, पुणे, महाराष्ट्र

02112-254057 02112-254056

www.niam.res.in

साकल्य

# दुभत्या जनावरांचे उन्हाळ्यातील व्यवस्थापन



भाकृअनुप ICAR

हर कदम, हर डगर किसानों का हमसफर भारतीय कृषि अनुसंधान परिषद

Agrisearch with a human touch


राअस्ट्रैप्रसं NIASM


## भाकृअनुप राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

## दुभत्या जनावरातील उष्णतेचा ताण म्हणजे काय?

- १०°C ते २४°C दुभत्या जनावरांसाठी आदर्श तापमान मानले जाते.
- ज्यावेळी वातावरणीय तापमान या कक्षेपेक्षा बाहेर जाते तेंव्हा जनावरांना उष्णतेचा ताण सहन करावा लागतो.
- उन्हाळ्यातील काळात दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होतो.
- उन्हाळ्यातील जनावरांचे व्यवस्थापन हे उष्णतेचा हानीकारक प्रभाव कमी करून दूध उत्पादनात सातत्य ठेवते.
- वातावरणातील उच्च तापमान आणि आर्द्रता ह्यामुळे शरीराला मिळणाऱ्या उष्णतेचे प्रमाण हे उष्णता कमी करण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त होते त्यामुळे जनावरांना उष्णतेचा ताण सहन करावा लागतो.

## दुभत्या जनावरातील ताण व्यवस्थापनाची प्रक्रिया




## उन्हाळ्यात दुभत्या जनावरांवर होणारा प्रभाव




- उष्णतेच्या ताणामुळे जनावरांची भूक कमी होवून कमी आहार घेतात.
- यामुळे पोटातील हालचाल कमी होते आणि संपूर्ण पाचनक्रिया बाधित होते.
- जेव्हा तापमान ३५°C पेक्षा जास्त असेल तेव्हा दुग्ध उत्पादनात ३०% पर्यंत आणि जेव्हा तापमान ४०°C पेक्षा जास्त असेल तेंव्हा ५०% पेक्षा अधिक घट होवू शकते.
- योग्य काळजी घेतल्यास ही घट कमी होते.
- उष्णतेच्या ताणाचा परिणाम वासरांच्या आणि कालवडींच्या वाढीवर अधिक होतो.
- उष्णतेचा ताण असणारी गाय माजावर रहात नाही व गाभणही रहात नाही.
- गाभण गायींना उष्णतेचा ताण बसल्यास गर्भाशयात वासराचा मृत्यू होऊ शकतो किंवा अकाली प्रसूती होऊ शकते.

## दुभत्या जनावरांचे उन्हाळ्यात व्यवस्थापन कसे कराल?

**सावली पुरवावी :** गोठ्या शेजारी झाडे लावून नैसर्गिकरित्या जनावरांना सावली मिळेल याची काळजी घ्यावी. उन्हाळ्याच्या महिन्यामध्ये तीव्र सूर्य किरणांपासून बचाव होण्यासाठी कृत्रिम छत तयार करून सुद्धा जनावरांना सावली देता येते.





**पाणी पुरवावे :** गायींना उष्णतेच्या ताणाच्या काळात पाण्याची जास्त गरज भासते. उन्हाळ्यात पाण्याच्या भांड्यांची संख्या वाढवावी. उष्णतेच्या काळात पुरेसे व मुबलक प्रमाणात थंड पाणी दिवसभर जनावरांना मिळेल याची विशेष काळजी घ्यावी.





**गोठ्यातील हवा खेळती राहावी :** मुक्त संचार गोठा पद्धतीच्या गोठ्यामध्ये योग्य उंचीच्या छताला असलेल्या सौदणांमुळे नैसर्गिक रित्या हवा खेळती राहते.

